# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र




०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ६८७ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- ३१/१२/२०१८


## अवैध दारु निर्मीती वर भंडारा जिल्हा पोलीसांची कार्यवाही

भंडारा:—दिनांक ३०/१२/२०१८ रोजी पोलीस अधीक्षक भंडारा श्रीमती विनीता साहू यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक गणेश काळे स्थागुशा भंडारा व कारधा येथील पोलीस हवालदार सोमेश्वर सेलोकर यांनी वेळीच सर्तकता दाखवुन शिताफिने मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे मिळालेल्या सुचनेनुसार मौजा जवाहरनगर व कारधा अंर्तगत येत असलेल्या नांदोरा नाला, जुना करचखेडा येथे अवैध दारूची विक्री करणारा आरोपी नामे राजु भोलाजी सेलोकर वय ३२ वर्ष रा. शहापुर, दिनेश किसन मेश्राम वय २५ वर्ष, रा. करचखेडा याने मोहाफुलाची हातभट्टी दारु गाळण्याकरीता सडवा मोहा पास व साहित्य किंमती १,३९,८००/—रु. चा माल मिळुन आला. त्याचप्रमाणे पोलीस स्टेशन जवाहरनगर येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक एस. के. बारसे व यांचे सहकारी सहायक फौजदार शेंडे, पोलीस हवालदार नत्थु सार्वे, मिलींद जनबंधू, एकनाथ जांबुळकर, वामन कुंमरे, पोलीस शिपाई विशाल मांढरे, कुणाल कढव यांनी वेळीच सर्तकता दाखवुन शिताफिने यांना मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे मिळालेल्या सुचनेनुसार आरोपी जितु रनभिड मेश्राम वय ३४ वर्ष, रा. संगम पुनर्वसन, विजय चंद्रभान मेश्राम वय ४० वर्ष, युध्दराज बाबुराव मेश्राम वय ४५ वर्ष, मनोज रामचंद्र मेश्राम वय ४० वर्ष, प्रशांत नंदलाल मेश्राम वय २८ वर्ष, विष्णु निलकंठ सरादे वय ३६ वर्ष, संदीप ज्ञानेश्वर मेश्राम वय २५ वर्ष, अनाधिकृपणे मोहाफुलाचा सडवा मोहा पास अवैधरीत्या वैनगंगा नदीचे तिरावर संगम बेट येथे मोहाफुलाचा सडवा रसायण( मोहापास) मोहाफुलाची दारु व दारु तयार करण्यासाठी एकुण २,९८,२६५/—रु. सडवा मोहा भरून ठेवलेल्या स्थीतीत मिळुन आले एका पेटीतुन देशी दारुने भरलेला १८०

एम. एल ची एक बॉटल सि. ए. सॅम्पल करीता वेगळी काढुन सिलबंद केले उर्वरीत जप्ती पत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले. यातील आरोपी विरुध्द कलम ६५ (ई)(फ)(ब)(क)(ड) मदाका अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

हि कार्यवाही स्थागुशा, पोलीस स्टेशन कारधा, जवाहरनगर येथील अधिकारी, कर्मचा–यांनी पार पाडली.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.